जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव

संदर्भः—मजाक / रोखशाखा / 3352 / 2026 दि.10 / 06 / 2026

सुधारीत रद्दी विक्रीची जाहीर निविदा

या जाहीर निविदेद्वारे तमाम रद्दी खरेदीदारांस कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव येथील अभिलेख कक्षातील मुदतबाहय मोस्तर फाडून निघालेली "ख" वर्गाची रद्दी विकी करावयाची आहे.

ज्या कोणी शासकीय रददी खरेदीदारांस याबाबत स्वारस्य असेल त्यांनी सदरहू रद्दी प्रत्यक्ष बघून रद्दी खरेदीचे भाव बंद लिफाप्यात मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पत्याच्या पाकीटावर रद्दी खरेदीचे दरपत्रक असा उल्लेख करुन प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव यांच्याकडेस दिनांक 19 / 06 / 2026 चे आंत अगर तत्पूर्वी कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी प्रत्यक्ष आणून द्यावेत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. रद्दी खरेदीचा भाव खालील शर्तीस अधिन राहून पुरवावेत.

श र्ती

1. रद्दीचे दरपत्रक स्विकारणे अगर नाकारणे याबाबतचे संपूर्ण अधिकार म. तदर्थ जिल्हा न्यायाधिश—2, जळगांव यांचेकडेस राखीव आहे.

2. रद्दी उचलण्याचे आदेश दिल्यानंतर त्वरीत संबंधित मक्तेदारास स्वखर्चाने या कार्यालयातून रद्दी उचलून न्यावी लागेल. विलंब झाल्यास त्यापासून उद्भवणा—या व होणा—या नुकसानीस सबंधीत खरेदीदार जबाबदार राहील. त्यास कोणत्याही प्रकारची भरपाई दिली जाणार नाही.

3. रद्दी उचलण्यापूर्वी खाली वाहनाचे वजन इलेक्ट्रॉनिक काटयावर जावून न्यायालयातील कर्मचा—या समक्ष करावे लागेल व त्यानंतर रद्दी वाहनामध्ये टाकता येईल, त्यानंतर रद्दीने भरलेले वाहन इलेक्ट्रॉनिक काटयावर नेवून न्यायालयातील कर्मचा—या समक्ष वाहनाचे वनज करावे लागेल. वजन करणेबाबतची फी रद्दी घेणा—यास भरावी लागेल.

4. रद्दी प्रत्यक्ष बघून निविदा भरण्यांत याव्यात आणि प्रत्यक्ष पाहून रद्दीचे भाव बंद लिफाप्यात कळवितांना प्रती क्विंटलचे दर अंकांत व अक्षरात दोन्ही प्रकारे नमूद करावेत.

5. दरपत्रके दिनांक 20/06/2026 रोजी सकाळी 10.30 वाजता म.तदर्थ जिल्हा न्यायाधिश–2, सो., जळगांव यांचे समक्ष उघडले जातील.

6. रद्दीबाबत योग्य ते दस्तऐवज सबंधीत अधिकारी हुकूम करतील त्याप्रमाणे तयार करुन द्यावे लागेल.

7. दरपत्रक उघडण्याचे दिवशी व त्यावेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे. अन्यथा आपले गैरहजेरीमध्ये दरपत्रके उघडण्यांत येतील.

8. सदरील रद्दी ही उचलल्यानंतर त्याच दिवशी रद्दीची रक्कम रोखीने रोखशाखा जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव रुम नं.111 मध्ये जमा करावी लागेल. तसेच सदरची रद्दी पेपर मिल मध्ये जमा करण्यांत यावी. स्थानिकरित्या स्थानिक ठिकाणी किरकोळ विकण्यात येवू नये.

म.जा.कं/रोखशाखा/3849/2026.
जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
दिनांक : 15/06/2026.

प्र.प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जळगांव

प्रत माहिती व नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्याकरिता सविनय सादर :

1. म.जिल्हा न्यायाधीश–1,जळगांव जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
2. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, जळगांव.
3. म.मुख्य न्यायदंडाधिकारी, जळगांव.
4. म.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय,जळगांव.
5. म.तहसिलदार, तहसिल कार्यालय,जळगांव.

प्र.प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय
जळगांव

जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव.
दिनांक : 15/06/2026.